Maharashtra State Board Of
Secondary & Higher Secondary
Education
Latur Divisional Board

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ, लातूर
विभागीय मंडळ, लातूर- ४१३५३१

सुतमिल एरिया,कन्हेरी रोड, राजस्थान शाळेच्या पाठीमागे, गजानन नगर, लातूर

Divisional Chairman Ph :( O2382) 229258 Divisional Secretary Ph :( O2382) 258570 Email: - divsecretarylatur@gmail.com

जा.क.लाविमं/माध्य.अ/ 953 दिनांक :– 01/08/2024

प्रति,

**प्राचार्य/मुख्याध्यापक,**
सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा/
उच्च माध्य. महाविद्यालये,
लातूर/नांदेड/धाराशिव.

**विषय** :– फेब्रुवारी–मार्च 2025 मध्ये होणा–या उच्च माध्यमिक/माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेपासून नवीन परीक्षा केंद्र सुरू करावयाचे असल्यास प्रस्ताव सादर करणेबाबत.

संदर्भः– राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र क.रा.मं/परीक्षा–8/3865 दि.23.07.2019

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. 12वी) फेब्रु./मार्च 2025 परीक्षेसाठी शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात नवीन परीक्षा केंद्र मिळण्यासाठी मंडळाच्या विहीत नमुन्यात प्रस्ताव **दि. 31.08.2024** पर्यंत **हस्तपोच** सादर करावा. याबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

ज्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात नवीन परीक्षा केंद्र सुरू करावयाचे आहे त्यांनी प्रथम प्रस्ताव फॉर्मची मंडळाकडे पत्राद्वारे मागणी करण्यात यावी व फॉर्म फी रू **1000/–**(रु.एक हजार फक्त) मंडळाकडे भरून प्रस्ताव फॉर्म विकत घेण्यात यावा.

नवीन परीक्षा केंद्राचा प्रस्तावासोबत खालील बाबींची पुर्तता करून त्याबाबतची सर्व कागदपत्रे व प्रपत्रे जोडावीत.

1. नवीन परीक्षा केंद्राची मागणी करणा–या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाने परीक्षा केंद्र घेणेबाबत पालक, शिक्षक, व्यवस्थापन समितीचा ठराव सादर करण्यात यावा. तसेच ज्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालये आपल्या केंद्रास जोडावयाच्या आहेत. त्याबाबत त्यांचाही पी.टी.ए चा ठराव सादर करण्यात यावा.
2. ज्या संस्था किंवा शाळा/कनिष्ठ महाविद्यालये आपल्या परीक्षा केंद्रास सलग्न होणार आहेत अशा शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे संमतीपत्र व हमीपत्र रूपये 100/– चे स्टॅम्प पेपरवर हमीपत्र घेणे आवश्यक आहे रूपये 100/– चे स्टॅम्प पेपरवर प्रस्तावासोबत सादर करावयाचा हमीपत्राचा नमुना प्रस्तावासोबत जोडलेला आहे.
3. प्रस्तावित नविन केंद्र शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामध्ये जनरेटर व इतर सर्व भौतिक सोईसुविधा असणे आवश्यक आहे. त्याबाबतचे हमीपत्र स्वत्रंत सादर करण्यात यावे. तसेच गुगल मॅपवर तालुक्याचा नकाशा सादर करण्यात यावा.
4. नवीन परीक्षा केंद्रावर समाविष्ठ हेणा–या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाची संख्या कमीत कमी 2 व त्या एकाच संस्थेच्या नसाव्यात नवीन मान्यता मिळालेल्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयास दोन वर्षापर्यंत परीक्षा केंद्र घेता येणार नाही.
5. नवीन परीक्षा केंद्र निर्माण केल्यास मूळ परीक्षा केंद्रावरील विद्यार्थी संख्येवर परिणाम होत नसल्याबाबत मूळ केंद्राचे (मुख्याध्यापक/प्राचार्य) हमीपत्र व नाहरकत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
6. गटशिक्षणाधिकारी व शिक्षणाधिकारी माध्य लातूर/धाराशिव/नांदेड यांचे स्वतंत्र लेखी अभिप्राय व शिफारस सादर करणे.
7. नवीन परीक्षा केंद्रावर इयत्ता 12वी शहरी भागासाठी 300, ग्रामीण भागासाठी 250 व अतिदूर्गम भागासाठी 150 ते त्यापुढील संख्येत विद्यार्थी प्रविष्ठ होणे आवश्यक आहे.
8. केंद्र प्रस्तावासोबत ना परतावा छाननी शुल्क **रू.10,000**/–(रु.दहा हजार फक्त) कार्यालयात जमा करावी व त्याची पावती प्रस्तावासोबत सादर करावी. सदरचे छाननी शुल्क परत करण्यात येणार नाही.

अपुर्ण प्रस्तावाचा विचार केला जाणार नाही. तसेच सदर प्रस्ताव या कार्यालयास विनाविलंब **दि.31.08.2024** पर्यंत हस्तपोच पाठवावा, तरी नवीन केंद्र निर्मितीचा प्रस्ताव विहीत दिनांकापर्यंत सादर करावा म्हणजे पुढील कार्यवाही करणे सुलभ होईल याची कृपया नोंद घ्यावी मुदतीनंतर येणारा प्रस्ताव स्विकारण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

विभागीय सचिव
लातूर विभागीय मंडळ, लातूर